**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स आशा रेझिन्स प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रमांक २२७/२, आळंदी-मरकळ रस्ता, गाव-धानोरे, तालुका-खेड, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण लिक्विड फॉर्म्युलेशन उत्पादन- ६००.० टीपीए ते १,०८० टीपीएपर्यंत, पावडर फॉर्म्युलेशन उत्पादन- ६००.० टीपीए ते ७००.० टीपीएपर्यंत, केटायन एक्सचेंज रेझिन्स उत्पादन- ३०० टीपीए ते ३,००० टीपीएपर्यंत, बायोसाईड उत्पादन- २४ टीपीए ते ३६० टीपीए पर्यत, डिस्पर्संट्स उत्पादन- २४ टीपीए ते ३६० टीपीएपर्यंत, फ्लोक्युलेटिंग एजंट्स उत्पादन- १२.० टीपीए ते २४०.० टीपीएपर्यत विस्तारिकरण आणि नविन ऑईल फिल्ड रसायनांच्या १२००.० टीपीए (पाणी आणि सांडपाणी प्रक्रिया -रेसिन्स आणि रसायन निर्मिती) प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स आशा रेझिन्स प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रमांक २२७/२, आळंदी-मरकळ रस्ता, गाव-धानोरे, तालुका-खेड, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण लिक्विड फॉर्म्युलेशन उत्पादन- ६००.० टीपीए ते १,०८० टीपीएपर्यंत, पावडर फॉर्म्युलेशन उत्पादन- ६००.० टीपीए ते ७००.० टीपीएपर्यंत, केटायन एक्सचेंज रेझिन्स उत्पादन- ३०० टीपीए ते ३,००० टीपीएपर्यंत, बायोसाईड उत्पादन- २४ टीपीए ते ३६० टीपीए पर्यत, डिस्पर्संट्स उत्पादन- २४ टीपीए ते ३६० टीपीएपर्यंत, फ्लोक्युलेटिंग एजंट्स उत्पादन- १२.० टीपीए ते २४०.० टीपीएपर्यत विस्तारिकरण आणि नविन ऑईल फिल्ड रसायनांच्या १२००.० टीपीए (पाणी आणि सांडपाणी प्रक्रिया -रेसिन्स आणि रसायन निर्मिती) प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक ०३ ऑगस्ट, २०२२ रोजी दुपारी १२.००

वाजता विश्वविलास मंगल कार्यालय, मुक्काम पोस्ट-सोळू, आळंदी-मरकळ रस्ता, तालुका-खेड, जिल्हा-पुणे येथे आयोजित करण्यात आलेली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई-५६/२०२२, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी -२२०७१२-एफटीएस-००२४, दिनांक १२-०७-२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती गठन करण्यात आलीः-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, पुणे<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी<br>प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी-पुणे-२<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>पुणे | - | **आयोजक** |

श्री. नितीन शिंदे, उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२, म.प्र.नि. मंडळ, पुणे तथा सदस्य, आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. हिम्मत खराडे, अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या

अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि जल वायू परिवर्तन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

सदस्य, आयोजक यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मेसर्स आशा रेझिन्स प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रमांक २२७/२, आळंदी-मरकळ रस्ता, गाव-धानोरे, तालुका-खेड, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र, यांचा कार्यरत असणाऱ्या प्रकल्पात प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण लिक्विड फॉर्म्युलेशन उत्पादन- ६००.० टीपीए ते १,०८० टीपीएपर्यंत, पावडर फॉर्म्युलेशन उत्पादन- ६००.० टीपीए ते ७००.० टीपीएपर्यंत, केटायन एक्सचेंज रेझिन्स उत्पादन- ३०० टीपीए ते ३,००० टीपीएपर्यंत, बायोसाईड उत्पादन- २४ टीपीए ते ३६० टीपीए पर्यंत, डिस्पर्संट्स उत्पादन- २४ टीपीए ते ३६० टीपीएपर्यंत, फ्लोक्युलेटिंग एजंट्स उत्पादन- १२.० टीपीए ते २४०.० टीपीएपर्यत विस्तारिकरण आणि नविन ऑईल फिल्ड रसायनांच्या १२००.० टीपीए (पाणी आणि सांडपाणी प्रक्रिया -रेसिन्स आणि रसायन निर्मिती) प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प हा घोषित औद्योगिक विभाग क्षेत्राबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ (सुधारित) अन्वये सर्व उत्पादनांसाठी एकत्रित - [**श्रेणी अ - ५ (एफ)**] मोडत आहे.

सदस्य, आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वन

आणि जल वायू परिवर्तन विभागात पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व तज्ज्ञ मुल्यांकन समिती (ईएसी-उद्योग-३), नवी दिल्ली यांनी १८ व्या बैठकी दरम्यान दिनांक २५ ऑक्टोबर, २०२१ आणि प्रस्ताव क्रमांक IA/MH/IND३/२३०८६८/२०२१ दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ रोजी त्यास मान्यता देण्यात आली.

वरील पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप-प्रादेशिक कार्यालय, पुणे-२ यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक २८ जून, २०२२ रोजी जाहिर जनसुनावणी सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल यांच्या प्रती विभागीय कार्यालय - पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर; मा. जिल्हाधिकारी कार्यालय - पुणे; जिल्हा परिषद - पुणे, जिल्हा उद्योग केंद्र - पुणे, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय - मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप-प्रादेशिक कार्यालय, पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप-विभागीय अधिकारी कार्यालय-खेड, तालुका-खेड, जिल्हा-पुणे, तहसिलदार कार्यालय-खेड, जिल्हा - पुणे, आळंदी नगरपरिषद, ता. खेड, जि. पुणे; ग्रामपंचायत, कार्यालये - धानोरे, सोळू, मरकळ व वडगाव घेणंद, तालुका-खेड, जिल्हा - पुणे व म.प्र.नि. मंडळाच्या संकतेस्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

आयोजक यांनी असे सांगितले की सदरहू प्रकल्पाबाबत स्थानिक उप-प्रादेशिक कार्यालय, पुणे-२, म.प्र.नि.मंडळ, पुणे यांना एकही आक्षेप प्राप्त झालेला नसून प्रकल्प समर्थनासाठी काही पत्र प्राप्त झालेली आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात सादरीकरणानंतर देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी पर्यावरणविषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली. पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत माहिती देताना घन कचरा व्यवस्थापन, हवा प्रदूषण नियंत्रणासाठी विविध उपाय, सीएसआर निधी, सीईआर निधी तसेच पर्यावरण व्यवस्थापन योजनांसाठी लागणारा भांडवली खर्च अंदाजे ३५५ लाख रुपये तर पर्यावरण व्यवस्थापन योजनांच्या अंमलबजावणीसाठी वार्षिक आवर्ती खर्च रुपये १२३.५ लाख याविषयी माहिती दिली. त्यांनी सांगितले की प्रकल्पातून प्रक्रिया केलेले सांडपाणी प्रकल्पाबाहेर जाणार नाही. सदरहू प्रकल्प हा शून्य सांडपाणी निकसन (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प असेल. सदरहू प्रकल्प विस्तारिकरणामुळे स्थानिकांना प्रत्यक्ष रोजगाराची संधी मिळणार असून परिसरातील व्यवसायांना अप्रत्यक्षरित्या भरपूर फायदा होणार आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे आक्षेप, सूचना, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. प्रश्नकर्त्यांना आपले संपूर्ण नांव व पता सांगण्याची सूचना केली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) <u>**श्री. अनिल गावडे, सरपंच, धानोरे ग्रामपंचायत, तालुका-खेड, जिल्हा – पुणेः-**</u>
हा रासायनिक प्रकल्प आहे. तर सांडपाण्याची विल्हेवाट कशी व कोठे लावणार? त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की आजची आमच्या गावाची परिस्थिती गंभीर आहे. पुर्णपणे कारखान्यातील औद्योगिक सांडपाणी/रासायनिक पदार्थ हे नाल्यात सोडलेले आहेत. साठवणुक केलेले जो रासायनिक पदार्थ असतो, तो जमिनीवर पडलेला असेल, तर तीन महिने पावसाळा आहे. पावसाच्या पाण्याने ते नाल्यात जाते. आमच्या येथे विहिरी आहेत, बोअर वेल्स आहेत, त्यांचे भरपूर प्रमाणात प्रदूषण होते. याबाबत आपल्या काय उपाययोजना आहेत?

श्री अनिल गावडे यांनी आक्षेप नोंदविला की परिसरातील संपूर्ण कंपन्यांचा घन कचरा हा गावातील गायरान जागेवर टाकला जातो. जरी प्रकल्प प्रवर्तक सांगतात की आम्ही प्रकल्पातील औद्योगिक सांडपाण्याची पूर्ण व्यवस्था केलेली आहे तर ती पूर्णपणे तपासण्यात यावी.

- प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, प्रकल्पात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी औद्योगिक सांडपाणी सनियंत्रण यंत्रणा (Effluent Treatment Plant - ETP ) व्यवस्था करण्यात येणार आहे की जो ११९.० केएलपीडी क्षमतेचा असेल. त्यातून आम्हांला ९५.० केएलपीडी प्रक्रिया केलेले सांडपाणी पुर्नवापरासाठी परत मिळेल. त्याचा प्रकल्पात पुनर्वापर होणार आहे. त्याचप्रमाणे घरगुती सांडपाण्यासाठी घरगुती सांडपाणी सनियंत्रण यंत्रणा (Sewage Treatment Plant - STP ) व्यवस्था पुरविली जाईल व प्रक्रिया केलेले घरगुती सांडपाणी हे प्रकल्पातील हरितपट्टा संवर्धनासाठी वापरण्यात येईल. सांडपाणी प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज/शून्य सांडपाणी निकसन प्रकल्प आहे.

  पुढे प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी घन कचरा संदर्भात असे सांगितले की, प्रकल्पातील घातक घन कचरा (Hazardous Solid Waste) प्रक्रिया, साठवणूक व विल्हेवाट महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार सामाईक घातक घन कचरा प्रक्रिया साठवण विल्हेवाट सुविधा (CHWTSDF-Common Hazardous Waste Treatment Storage Disposal Facility) केंद्रास बंद गाडीतूनच पाठविला जाईल. प्रकल्पात घन कचरा हा प्रक्रिया करताना खाली पडणार नाही.

  पर्यावरण सल्लागार यांनी पुढे सांगितले की आमचा प्रकल्प हा पूर्णपणे आच्छादित केलेला आहे. त्यामुळे घन कचरा पावसाच्या पाण्यात मिसळण्याचा प्रश्न येत नाही. त्याचप्रमाणे शून्य सांडपाणी निकसन प्रकल्प असल्याने परिसरातील जल स्त्रोतांवर कुठलाही नकारात्मक परिणाम होणार नाही. प्रकल्पात रसायने खाली न पडण्याची पुरेपुर काळजी घेण्यात येते, त्यामुळे खाली पडलेले रसायन/घातक घन कचरा पावसाच्या पाण्यात मिसळण्याचा काहीही प्रश्न उद्भवत नाही.

श्री गावडे यांनी परिसरातील प्रदूषणाबाबत मुद्दे उपस्थित केले असताना सदस्य, आयोजक यांनी त्याबाबत त्वरित पुढील कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.
आयोजक यांनी पर्यावरण सल्लागार यांना शून्य सांडपाणी निकसन संकल्पना राबविण्यास ज्या उपाय योजना करणार आहात, त्याची माहिती उपस्थितांना देण्याची सूचना केली.
पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पास १५९.० केएलपीडी पाणी लागेल व त्यातून ११९.० केएलपीडी औद्योगिक सांडपाणी उत्पन्न होईल. औद्योगिक सांडपाणी प्रक्रियेसाठी सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणेची व्यवस्था करण्यात येईल. त्यातून आम्हांला ९५.० केएलपीडी प्रक्रिया केलेले सांडपाणी पुनर्वापरासाठी परत मिळेल. त्याचा प्रकल्पात पुनर्वापर होणार आहे, त्यामुळे प्रकल्पातून कोणतेही सांडपाणी बाहेर सोडले जाणार नाही. घरगुती सांडपाण्यावर घरगुती सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेत प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पातील हरित पट्टा संवर्धनासाठी वापर करण्यात येईल. कुठल्याही प्रकारे सांडपाणी भूजल, पाणवठ्यावर सोडण्यात येणार नाही.

२) <u>श्री सुशांत धरड, आळंदी, तालुका-खेड, जिल्हा-पुणेः-</u>

नवीन विस्तारिकरण प्रकल्पामुळे किती लोकांना रोजगार उत्पन्न होणार आहे?

- पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पात ३३ लोकांना रोजगाराची संधी देण्यात येईल. विद्यमान प्रकल्पात २३ व्यक्ती कार्यरत आहेत. म्हणजे एकूण ५६ व्यक्तींना रोजगार उपलब्ध होईल.

३) <u>श्री महेन्द्र शेलार, धानोरी, तालुका-खेड, जिल्हा-पुणेः-</u>

या विस्तारिकरण प्रकल्पामुळे धानोरी ग्रामस्थांना आणि गावाला काय फायदा होणार आहे?

- पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, विस्तारिकरणामुळे प्रकल्पाच्या सीएसआर उपक्रमात वाढ होईल. त्यामुळे गावातील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होण्यास मदत होऊ शकेल. त्याचप्रमाणे ३३ स्थानिक लोकांना रोजगाराची संधी मिळेल. विस्तारिकरणामुळे परिसरातील व्यवसायात अप्रत्यक्षरित्या वाढ होईल.

४) **<u>श्री.हनुंमत उमाजी जाधव, आळंदी, तालुका-खेड, जिल्हा -पुणेः-</u>**

विस्तारिकरण प्रकल्पामुळे हवेवर काही दुष्परिणाम होईल काय?

- पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, सदरहू प्रकल्पाचा हवेवर दुष्परिणाम होऊ नये, म्हणून विविध उपाययोजना करण्यात येतील. उदा.-डस्ट कलेक्टर. प्रकल्पात केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने हवेच्या गुणवत्तेसाठी पारित केलेली मानके पूर्णपणे पाळण्यात येतील. विस्तारिकरण लक्षात घेऊन प्रकल्पात अत्याधुनिक हवा प्रदूषण नियंत्रण संयत्रणा कार्यान्वित करण्यात येतील.

५) **<u>श्री धीरज हरदुले, आळंदी,तालुका-खेड,जिल्हा-पुणेः-</u>**

विस्तारिकरण प्रकल्पास उत्पन्नासाठी रोज किती पाणी लागेल व त्याची व्यवस्था कशी करण्यात येईल?

- पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की या प्रकल्पासाठी रोज १५९ किलो लिटर पाणी लागणार आहे. प्रकल्पातील ९५.० किलो लिटर प्रति दिन प्रक्रिया केलेले सांडपाणी पुनर्वापरासाठी मिळणार आहे. तर उर्वरित ६४.० किलो लिटर प्रति दिन पाण्यासाठी केंद्रीय भू-जल मंडळ (Central Ground Water Board) यांची परवानगी मिळण्यासाठी अर्ज केलेला असून विदयमान प्रकल्पात पाणी हे विकत घेण्यात येत आहे. शासनाची पूर्वपरवानगी घेऊनच पाणी ऊपसा करण्यात येईल.

  आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून नंतर प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आज आपण मे. आशा रेझिन्स प्रायव्हेट मिलिटेड यांच्या विस्तारिकरण प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक जनसुनावणीसाठी जमलो आहोत. प्रकल्पाच्या सल्लागार यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजनांची संपूर्ण माहिती सादरीकरणाव्दारे दिलेली आहे. पाण्याची, घन कचऱ्याची विल्हेवाट त्याचप्रमाणे हवा प्रदूषण नियंत्रण उपाययोजनेविषयी

चर्चा झालेली आहे. या जनसुनावणी बैठकीचे इतिवृत तयार करण्यात येईल व ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत बैठकीच्या व्हिडिओ रेकॉर्डिंगसह शासनासह सादर करण्यात येईल. त्यांनी जनसुनावणीस उपस्थित राहिल्याबद्दल स्थानिकांचे आभार मानले.

आयोजक यांनी सांगितले की, बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेल्या पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल व ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ यांच्या मार्फत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्यावतीने बैठक संपन्न झाल्याचे घोषित केले.

बैठकीत उपस्थितांनी स्वाक्षरी केलेली यादी **(सोबत क्रं. १)**, प्राप्त झालेल्या लेखी सूचना, आक्षेप एकत्रित **(सोबत क्रं. २)** जोडलेले आहेत. प्रस्तावित प्रकल्पाच्या समर्थनार्थ एकूण ०१ (एक) पत्र प्राप्त झालेली आहेत.

**(नितीन शिंदे)**
सदस्य, समन्वयक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप- प्रादेशिक अधिकारी, पुणे - २,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे

**(हिम्मत खराडे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी – पुणे,
जिल्हा-पुणे